ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# नवीन शैक्षणिक धोरण व आव्हाने

* सौ. निकिता पंकज तरे,

* सहाय्यक प्राध्यापक, आदर्श कॉलेज बदलापूर पूर्व

**प्रस्तावना:**

आजच्या समाजात शिक्षणाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे शिक्षणाचे बरेच उपयोग आहेत परंतु त्यास एक नवीन दिशा देणे आवश्यक आहे शिक्षण असे असावे की, एखादी व्यक्ती आपल्या सभोवतालची परिचित होऊ शकेल शिक्षण आपल्या सर्वांचा उज्वल भविष्यासाठी आवश्यक साधन आहे. आपल्या जीवनात शिक्षणाची साधने वापरून आपण काही चांगले साध्य करू शकतो. उच्चस्तरीय शिक्षण लोकांना सामाजिक आणि कौटुंबिक आदर ठेवण्यास आणि एक वेगळी ओळख निर्माण करण्यास मदत करते शिक्षणाचा काळ हा सर्वांसाठी सामाजिक आणि वैयक्तिकरित्या खूप महत्त्वाचा आहे यामुळेच आपल्या जीवनात शिक्षणाचे इतके महत्त्व आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

चांगले शिक्षण आयुष्यातील अनेक उद्दिष्ट देते. जसे कि, वैयक्तिक प्रगती, सामाजिक स्तर वाढवणे, सामाजिक कल्याण, आर्थिक प्रगती, राष्ट्राची यशस्विता, जीवनातील ध्येय निश्चित करणे, सामाजिक समस्यांविषयी जागरूक करणे आणि पर्यावरण समस्या आणि इतर सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी इत्यादी. दूरशिक्षण प्रणालीचा वापरामुळे आज-काल शिक्षण व्यवस्था खूप सोपी व सोयीस्कर झाली आहे आधुनिक शिक्षण प्रणाली निरक्षरता व विविध जाती धर्म आणि जमातींमधील समानतेचा मुद्दा पूर्णपणे काढून टाकण्यास सक्षम आहे. शिक्षण म्हणजे नावीन्य, नावीन्य आणि सर्जनशीलता तेव्हाच येऊ शकते जेव्हा लोक वेगवेगळया तंत्रज्ञानासह कसे कार्य करायचे हे जाणून घेण्यासाठी पुरेशी कुशल असतात सुशिक्षित लोक नेहमी चांगल्या तंत्राच्या मदतीने त्यांच्या समस्यांवर उपाय शोधतात शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे त्याचा वापर करून आपण जगाचा दृष्टिकोन बदलू शकतो. शिक्षण देशाच्या जलद विकासाची प्रक्रिया सक्षम करते तुमचे शिक्षण चांगले असेल तर तुम्ही देशाच्या तुमच्या देशाची चांगली सेवा करू शकता त्यातून चांगली राजकीय विचारधारा विकसित होते.

भारतात प्राचीन काळी गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाई. त्यात विद्यार्थी गुरूच्या घरी राहून ज्ञान मिळवत तेथेच घरकाम व शेती यांसारख्या गोष्टींमध्ये मदत करत त्यांच्याकडे तेव्हा पुस्तक वगैरे नव्हती. त्यामुळे वेद, उपनिषदांचा पाठांतर करून ज्ञान मिळवलं जाई. तर कृषी, पशुपालन, वाणिज्य, स्थापत्य, मूर्तिकला, नृत्य, संगीत, सुतारकाम, धातुकाम असेही त्यांचे अभ्यासविषय असत तक्षशिला नालंदा यांसारख्या विद्यापीठातील उच्च शिक्षणात वक्तृत्व, वादविवाद, प्रश्न-प्रतिप्रश्न यांवर व चिकित्सक बुद्धी यांवर भर असे.

धनुर्विद्या, आयुर्वेद अन्य व्यवहारोपयोगी विद्या व कला यात प्रात्यक्षिकाचा भाग मोठा असे. पाठांतराच्या बरोबरीनेच निरीक्षण, अनुकरण, मार्गदर्शन व चिंतन यांवरही भर असायचा. मात्र काळ जसा बदलत गेला तसा शिक्षण क्षेत्रातही फार मोठे बदल घडत गेले.

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण:**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे एकविसाव्या शतकातील पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे भारतीय स्वातंत्र्यानंतर पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 मध्ये ठरविण्यात आले होते त्यानंतर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये लागू करण्यात आले. 1992 मध्ये या धोरणात काही प्रमाणात बदल करण्यात आला. 2009 मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार मिळाला त्यानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात आला.

शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करत केंद्र सरकारने नवे शिक्षण धोरणाला मंजुरी दिली आहे यात शिक्षणव्यवस्था बहुवैविध्य, बहुभाषिक करण्याकडे अधिक भर देण्यात आला आहे जीडीपीचा सहा टक्के इतका निधी शिक्षणासाठी देण्याची व्यवस्था या नव्या धोरणात नमूद करण्यात आली आहे. या धोरणाच्या निमित्ताने तब्बल 34 वर्षांनी देशात शिक्षण धोरण अद्ययावत करण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे.

- केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नामकरण यानुसार आता शिक्षण मंत्रालय असं होणार आहे
- मल्टी डिसिप्लिनरी अभ्यासक्रम- एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकवता येणार आहेत यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉप आऊट यामुळे कमी होतील.
- बहुभाषिक शिक्षण
- 3 ते 14 वर्षे वयोगटातील विद्यार्थी व शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आलेले आहेत यापूर्वी हा वयोगट सहा ते चौदा वर्ष होता
- 10+2 अशी शाळेची रचना होती ती 5+3+3+4 अशी असणार आहे. बालवाडी ते दुसरी, तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, आणि नववी ते बारावी अशी रचना यापुढे असेल.
- जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्या विद्यार्थीसाठी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात त्या विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षाची पदवी अभ्यासक्रम असेल. म्हणजेच रिसर्च करण्यासाठी पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम चार वर्षाची पदवी असेल. त्यानंतर ते थेट पीएचडी करू शकतील त्यांना एम फिल ची आवश्यकता नसेल.
- सकल पटनोंदणी ग्रॉस एन्रोलमेंट 2035 पर्यंत 50 टक्के पोचवण्याचं उद्दिष्ट आहे.
- विद्यार्थ्यांची प्रगतीपुस्तक बदलणार आहे शिक्षकांसोबत विद्यार्थीदेखील स्वतःच मूल्यांकन करणार.
- सर्व महाविद्यालयांसाठी एकच सामायिक प्रवेशपरीक्षा “एन.टी.ए” ही परीक्षा घेणार मात्र ही ऐच्छिक असेल.

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण व आव्हाने :-**

नवे शैक्षणिक धोरण जाहीर झाल्याच्या वर्षापुर्ती निमित्त बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असे म्हणाले की, आपण स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहोत. एकप्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा आता एक महत्त्वाचा भाग असणार आहे.

हे एकविसाव्या शतकातील सर्वात दूरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मांडले. परंतु या धोरणामुळे शिक्षण सर्वसमावेशक किफायतशीर होईल का? खरंच शिक्षण क्षेत्रात बदल होऊन अनेक अमुलाग्र क्रांती घडेल का? असे प्रश्न सर्वसामान्यांच्या मनाला भेडसावत आहे. कारण हे धोरण भारताच्या प्रगतीसाठी जरी महत्वाचे असले तरी त्या समोर देखील भरपूर आव्हाने आहेत.

- सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणी यासाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे.
- या धोरणामध्ये मोबाईलवर कागदपत्रे अपलोड करून डिजिटल लॉकर आणि अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट (ए.एस.बी) अकाउंट ओपन करायचे आहे त्यासाठी विद्यार्थ्यांच्या स्वतःकडे मोबाईल असणे गरजेचे आहे. सिमकार्ड त्याला संलग्न केलेल्या आधारकार्ड, ईमेल आयडी आवश्यक आहे.
- ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतःचा मोबाईल नाही विशिष्ट बहुतांश मुलींकडे नाही त्यांनी शिक्षण कसे घ्यायचे असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.
- विद्यापीठाच्या लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम (एल.एम.एस) वर 106 प्रकारचे अभ्यासक्रम मोफत उपलब्ध आहेत. इतर अभ्यासक्रम ऑनलाईन करायचे आहेत आणि स्कील बेस्ड व्हॅल्यू अडेड अभ्यासक्रमांना अनुक्रमे दोन व एक क्रेडिट पॉईंट देणारी येणार आहेत ते त्याचे ए.एस.बी अकाउंटवर जमा होणार आहेत.
- चंदगड तालुक्या सारख्या अनेक गावात अजूनही इंटरनेट नाही मोबाईल हि काही मुलाकडे नाही अशीच परिस्थिती भारताच्या अनेक खेड्यांमध्ये आहे काही मुलांकडे मोबाइल सुद्धा नाहीत अशा परिस्थितीत शिक्षण घेणे कठीण होणार आहे.
- भारताच्या लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे.
- नव्या धोरणाची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या 6 टक्के वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम आहे. उदाहरणार्थ 1968 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशाच्या उत्पन्नाच्या सहा टक्के पर्यंत

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

देण्याची शिफारस करण्यात आली मात्र गेल्या काही दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च तीन टक्के पुढे गेलेला नाही. आणि ज्या वर्षीचे नवीन शैक्षणिक धोरण आले त्या वर्षी शिक्षणावरील खर्च सर्वात कमी होता 2020-2021 मध्ये शिक्षणावरील खर्च 99311 कोटीवरून 2021–2022 मध्ये 93 हजार 224 कोटी इतका कमी झाला.

- राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाची अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे अवघड काम आहे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खूप चांगले बदल घडणार आहे परंतु ते घडवण्यासाठी खूप वेळ सुद्धा लागणार आहे हे बदल 2024 पर्यंत हळू हळू घडणार आहेत.

**जग व शैक्षणिक बदल:**

जगामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये महत्त्वाचे बदल आमूलाग्र क्रांतीला पूरक ठरत आहे. भारताने त्याचीसुद्धा दखल घेतली पाहिजे फिनलँड श्रीमंत देशांची मध्ये खूप वरच्या स्थानावर आहे. शांत आणि सुखी जगण्याच्या बाबतीतही फिनलँड क्रमांक एक वर आहे. भ्रष्टाचारमुक्त व्यवहारात, लैंगिक समानतेत, सुरक्षितेत व शांततेत फिनलँड जगात एक नंबर देश आहे. म्हणुनच जगात सर्वात आनंदी देशांमध्ये फिनलंड क्रमांक एकवर आहे. आणि फिनलँड चे नेतृत्व करत आहेत जगातील सर्वात तरुण पंतप्रधान सना मरिन.

बालवाडीच्या कोंडवाड्यात घुसमटलेली, अभ्यासाच्या ओझ्याखाली दबलेली मार्क्स व परीक्षा पद्धतीत फसलेली, शिक्षकांचा मूल्यांकनाचा अधिकार नसलेली आपली शिक्षण व्यवस्था फिनलँड ज्ञानरचनावादी या दिशेने नेता येईल का? याचा विचार करणे आजच्या काळात फार गरजेचे आहे. आज फिनलँड सारख्या देशात तेथील मुले कॅन्टीनमध्ये जेवन वाढायचं, पैसे गोळा करायचं आणि एकूण जमाखर्चाचा हिशोब ठेवण्याचे काम करतात म्हणजे गणित वहीत शिकून नंतर आपल्या जीवनात त्याचं वापर करण्यापेक्षा गणित खऱ्या जीवनात शिकून नंतर परीक्षेत लिहिण्यावर त्याचा भर दिला जातो आज या देशात तिथल्या शिक्षकांना डॉक्टर व वकील यांच्या इतकाच मान मिळतो हे सगळं आपल्या शिक्षण क्षेत्रामध्ये झालं पाहिजे.

जपान देशाचा विचार केल्यास जपानमध्ये प्रत्येक शाळेत मुलांना शेती कशी करायची हे शिकवले जाते शेती हा विषय शिकवत असताना शाळेच्या आवारात कांदे-बटाटे, मिरची, टोमॅटो, अशा विविध पालेभाज्यांची लागवड केली जाते तेथुन उगवलेले पालेभाज्या पासून खाण्याचे पदार्थ कसे बनवावे? हे देखील शिकवले जाते. मधल्या सुट्टीत मुलांना हेच पदार्थ खायला दिले जातात. भारत हा कृषीप्रधान देश आहे भारताच्या 70 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात असे असताना भारतातील बहुतांश मुलांना शाळेत शेती विषय शिकवला जात नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना पालेभाज्या, फळभाज्या विषयी खूप कमी ज्ञान असते.

जपानमध्ये साक्षरता दरही जास्त आहे. जपानमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान या बरोबरीनेच नैतिक मूल्य, नीतिशास्त्र यांवर लक्ष केंद्रित केले जात आहे जपान मधली मुलं शाळेत स्वतः साफसफाई करतात. कोणतीही गोष्ट छोटी किंवा मोठी नसते. प्रत्येक कामाची किंमत असते हे विद्यार्थ्यांना शिकवणे गरजेचे आहे भारताने या गोष्टीचा विचार आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विचार करणे गरजेचे आहे.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

जपानी शाळांमध्ये कायद्यानुसार नियमित आरोग्य तपासणी केली जाते आणि वजन मोजले जात नाही तर दृष्टी आणि लघवीच्या तपासणी केल्या जातात रोग किंवा समस्या असतील तर लक्षात आल्यानंतर लगेच त्यावर उपचार केले जातात दात किडले आहेत का ते नीट घासले जातात नाही याची दंतचिकित्सक काकडून तपासणीही केली जाते आपली शिक्षण प्रणाली याबाबतीत कुठेतरी मागे ठरते असं म्हटलं तर काही वावगं ठरणार नाही आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी असं काही खास अभ्यासक्रम नाही पण ते जर आपण देशाचा विचार केला तर भूकंप सुनामी पूर या नैसर्गिक आपत्ती जपानमध्ये पुन्हा पुन्हा करतात म्हणून हीच गोष्ट लक्षात घेऊन शाळांमध्ये आपत्ती व्यवस्थापन नियमितपणे घेतल्या जातात भूकंप आलेले सर्व प्रथम काय करावे आग लागल्यावर सुरक्षित ठिकाणी पळून जाण्यासाठी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात आपत्ती काळात आपत्तीकालीन परिस्थितीत त्यांचे प्राण वाचविण्यासाठी मुले शाळेत शिकतात.

देशाचा विचार केला तर जर्मनी देश हा त्याच्या कार्यक्षमतेसाठी ओळखला जातो जर्मनीने आपल्या मानवी भांडवलामध्ये जास्त इन्वेस्ट केल्याचा आपल्याला समजत आहे. व्यवसायिक प्रशिक्षणावर जास्त भर देतात तर तेथील मुलं क्लासरूममध्ये शिक्षणात जास्त रुचकर नसतील तर ते ड्यूयल वोकेशनल एज्युकेशन अंड ट्रेनिंग प्रोग्रॅम मध्ये सहभागी होऊ शकतात जर्मनीमध्ये लीगल असिस्टंट, एअर ट्रॅफिक कंट्रोलर, वेब डिझायनर असे 350 वेगवेगळे कोर्स निवडून ते वेगळा मार्ग निवडू शकतात आणि महत्त्वाचं म्हणजे चार लाखापेक्षा अधिक कंपनीचा आहे ज्या विद्यार्थ्यांना शिकवत प्रशिक्षण देतात अशा वेळी त्यांना एक रिस्पेक्टेबल स्टायपेंड दिला जातो सरासरी स्टायपेंड हा 1000 यूरो असतो तेथील शिक्षण हे प्रात्यक्षिकांवर जास्त भर देते त्यामुळे एक प्रशिक्षित लोकांची सेना इथे तयार होते आणि आर्थिक व्यवस्था त्याच्यामुळेच मजबूत होते आणि भारतामध्ये अशा बदलांची सध्या आवश्यकता आहे.

जर्मन तंत्रज्ञान अद्यावत कार डोळ्यासमोर येतात तेथील शिक्षण पद्धती अतिशय प्रभावशाली आहे आपल्याकडे विद्यापीठांची रँकिंग पाहिली जाते मात्र तेथे तशी पद्धत नाही छोट्यातील छोटी विद्यापीठ हे उत्तम आतील उत्तम अभ्यासक्रम देण्याचा प्रयत्न करतात शैक्षणिक संस्थांचे उद्योगांशी असलेले सामंजस्य करार यामुळे तुम्हाला अभ्यासक्रम शिकतानाच प्रात्यक्षिकाची संधी मिळते त्यामुळे संधी मिळण्याची संधी अधिक निर्माण होतात त्याच प्रकारचे शिक्षण देण्यावर तेथील विद्यापीठांचा भर असतो.

आज कौशल्यावर आधारित शिक्षण हा पर्याय नसून गरज आहे कुशल व्यक्तींच्या तुलनेत कुशल व्यावसायिकांची मागणी खूप जास्त आहे शाळांनी शिक्षणासोबत कौशल्याधारित शिक्षणावर अधिक भर दिला पाहिजे. आज एकविसाव्या शतकात शिक्षण महत्त्वाचे असले तरी कौशल्य हे सर्वात महत्त्वाचे आहे. लहानपणापासूनच मुलांना कौशल्यावर आधारित शिक्षण देणे गरजेचे आहे. कारण त्याचा त्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो ही काळाची गरज आहे. सध्याच्या महामारीने स्थानिक उत्पादनांचा वापर वाढवला आहे आणि लोकांना कौशल्य चलित समाजाचे महत्व ओळखण्यास मदत केली आहे. कौशल्यावर आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षितता दोन्ही मिळू शकतात कारण ते अनोपचारिक आणि औपचारिक दोन्ही प्रकारच्या शिक्षणाची समतुल्य पावती प्रदान करते. विद्यार्थी हे देशाचे मानवी भांडवल असून अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम आणि कौशल्य आधारित शिक्षण यांचा परिचय त्यांना भविष्यासाठी तयार करण्यास मदत करेल आणि रोजगार क्षमता कौशल्य शिकण्यास मदत करेल. कौशल्य आधारित प्रशिक्षण सादर केल्याने कमकुवत विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या मजबूत होण्यास मदत होईल. कौशल्य आधारित शिक्षण नेटवर्किंग आणि संवादासाठी कौशल्य विकसित करण्यास मदत करेल कौशल्य विकास कार्यक्रम लोकांची विद्यार्थ्यांची प्रतिभा ओळखण्यास व विकसित करण्यास मदत करतील.

आपण ज्या गतिमान जगात राहतो त्याचा विचार करता शिक्षण आणि वास्तवीक जग यांच्यातील संबंध विकसित करणे महत्त्वाचे ठरणार आहे पारंपारिक शिक्षण पद्धतीला आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये रूपांतरित करणे गरजेचे आहे आधुनिक शिक्षण पद्धती मध्ये विद्यार्थ्याला विविध कौशल्य शिकण्यास मदत होईल त्यामुळे त्यांना भविष्यात मदत होईल शिक्षणामध्ये व्यावहारिक शिक्षणाचे वातावरण समाविष्ट करणे आणि कामाच्या ठिकाणी दुवा निर्माण करणे हे गरजेचे आहे

आजच्या जगात तणाव हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग बनला आहे आणि जर त्याचे व्यवस्थापन योग्यरीत्या केले गेले नाही तर त्याचा आपल्या मानसिक व शारीरिक परिणाम होऊ शकतो म्हणून शाळेने विद्यार्थ्यांना ध्यान विश्रांती आणि व्यायाम या सारख्या विविध तंत्राचा अवलंब करून तणावाचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकवले गेले पाहिजे.

**निष्कर्ष:**

भारताने जर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या समोरील आव्हानाचा विचार केला व नवीन शैक्षणिक धोरणा समोरील प्रश्न सोडवले तर नक्कीच ह्या व्या शतकात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडतील ते देशाच्या प्रगतीसाठी पोषक वातावरण निर्माण करतील.नवीन शैक्षणिक धोरण हे पुढील शिक्षणाचा एक आदर्शवत नमुना असेल आणि तो सर्वाभिमुख समाज निर्मिती साठी आवश्यक मुल्यांची जपणूक करणारा असेल यात ज्ञानरचानावादी समाजची बीजे पेरली जातील यात मुळीच शंका नाही.

**संदर्भ:**


- शिक्षणमित्र – https://www.shikshanmitra.com 6-9-2021
- मनीषा फाळके महाराष्ट्र टाइम्स वृत्तसेवा, दिनांक 30-7-2020
- Observer Research foundation Dt. 7/12/2021
- सुनिल कोडुसकर- सकाळ वृत्तसेवा दिनांक २१ नोव्हेंबर २०२२
- Interview – India’s education system to be world class by 2040 : Ramesh pokhriyal nishank by express news service published on 2nd August 2020


**Cite This Article:**

***सौ. निकिता पंकज तरे***, *(2022)* नवीन शैक्षणिक धोरण व आव्हाने, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 132-137.*